MCX
METAL & ENERGY
Trade with Trust

MCX/SEC/2679

May 09, 2026

To,
Listing Department
BSE Limited,
P.J. Towers,
Dalal Street, Fort
Mumbai 400001

**Scrip code: 534091, Scrip ID: MCX**

**Subject: Intimation on publication of financial results in the newspapers**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed newspaper publication in Navshakti (Marathi), newspaper on Saturday, May 09, 2026 containing Audited financial results (Consolidated & Standalone) for the quarter and year ended March 31, 2026, as approved by the Board of Directors at their meeting held on Friday, May 08, 2026.

The same will also be available on the website of the Company at www.mcxindia.com

Kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,

**For Multi Commodity Exchange of India Limited**

**Manisha Thakur**
**Company Secretary**

Multi Commodity Exchange of India Limited * Mumbai *

*Encl: as above*

MULTI COMMODITY EXCHANGE OF INDIA LTD.
EXCHANGE SQUARE, SUREN ROAD, ANDHERI (EAST), MUMBAI 400 093, INDIA. TEL.: +91-22-6731 8888, FAX: +91-22-66494151, www.mcxindia.com
CIN L51909MH2002PLC135594, info@mcxindia.com

marathi.freepressjournal.in
Reg.No.MCS/049/2021-23/RNI No.1691/57 m.p.c.s. office mumbai-400 001

परंपरा आणि नवतेचा संगम

# नवशक्ति

शनिवार ● ९ मे २०२६



## ‘तारा’ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली :** भारताने संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाकडे आणखी एक मोठे पाऊल टाकले आहे. गुरुवारी ओदिशाच्या किनारपट्टीवर स्वदेशी बनावटीच्या ‘टॅक्टिकल ॲडव्हान्स्ड रेंज ऑगमेंटेशन’ (तारा) या नवीन ‘ग्लाइड’ शस्त्र प्रणालीची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी पार पडली.

संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ‘तारा’ ही भारताची पहिली स्वदेशी ग्लाइड वेपन सिस्टम आहे. ही प्रणाली जुन्या आणि अनगाइडेड (नियोजित लक्ष्याशिवाय असलेल्या) युद्धनौकांवरील किंवा विमानांवरील दारुगोळ्याला ‘प्रिसिजन गाइडेड वेपन्स’ म्हणजेच अचूक मारा करणाऱ्या शस्त्रास्त्रांमध्ये रूपांतरित करण्यासाठी विकसित करण्यात आली आहे.

जमिनीवरील शत्रूच्या लक्ष्यांना अचूकपणे टिपण्यासाठी आणि कमी खर्चात अधिक मारक क्षमता मिळवण्यासाठी ही प्रणाली विकसित केली आहे. हे पहिलेच असे ‘ग्लाइड वेपन’ आहे ज्यामध्ये अत्यंत आधुनिक पण कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात

संमिश्र पानावर


# थलपती होणार मुख्यमंत्री

## ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र सादर, आज शपथविधी

**चेन्नई :** तमिळनाडू विधानसभेच्या रिंगणात प्रथमच उतरून प्रस्थापित पक्षांना जोरदार धक्का देणारा टीव्हीके पक्ष आणि त्या पक्षाचे नेते व अभिनेते थलपती विजय यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग अखेर शुक्रवारी मोकळा झाला. राजभवनात झालेल्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीनंतर, राज्यपालांनी विजय यांना सरकार स्थापन करण्यासाठी अधिकृतपणे आमंत्रित केले आहे. ‘तमिळगा वेत्री कळघम’चे (टीव्हीके) नेते थलपती विजय शनिवारी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या सत्तास्थापनेत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (मार्क्सवादी) दिलेला पाठिंबा निर्णायक ठरला असून, राज्यात आता एका नवीन युतीचे समीकरण पाहायला मिळणार आहे.

माकपचे नेते के. बालकृष्णन यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना या घडामोडींची पुष्टी केली. ते म्हणाले की, पाठिंब्याचे पत्र सादर केल्यानंतर राज्यपालांनी विजय यांना सरकार स्थापनेचे निमंत्रण दिले आहे. राजभवनातून बाहेर पडल्यानंतर विजय यांनी थेट माकपच्या मुख्यालयाला भेट देऊन डाव्या आघाडीच्या नेत्यांचे आभार

संमिश्र पानावर



### ‘लोकशाहीसाठी पाठिंबा’

भाकपचे प्रदेश सचिव वीरपांडियन यांनी या युतीला ‘लोकशाही कर्तव्य’ म्हटले आहे. ते म्हणाले, टीव्हीके हा सर्वात मोठा पक्ष आहे आणि त्यांना केवळ ६ आमदारांची गरज होती. लोकशाही आणि जनतेच्या हितासाठी आम्ही त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, भाकपने हा पाठिंबा ‘सशर्त’ असल्याचे नमूद केले असून, राज्यात स्थिर, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी शासन मिळावे ही आमची प्रमुख अट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## सुवेंदू अधिकारी आज घेणार शपथ

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात शुक्रवारी एका ऐतिहासिक पर्वाची सुरुवात झाली. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना निवडणुकीत सलग दोनदा पराभूत करणारे भाजपचे ज्येष्ठ नेते सुवेंदू अधिकारी यांची शुक्रवारी भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे सुवेंदू अधिकारी यांचा पश्चिम बंगालचे भाजपचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अधिकारी यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली. नवनिर्वाचित आमदार आणि पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला.



नव्या भाजप सरकारचा शपथविधी सोहळा शनिवार, ९ मे रोजी कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर पार पडणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित

संमिश्र पानावर

## वेणुगोपाल, सतीशन नेतेपदाच्या शर्यतीत

**नवी दिल्ली :** केरळमधील नवनिर्वाचित आमदारांचे मत जाणून घेण्यासाठी नियुक्त केलेल्या काँग्रेसच्या दोन निरीक्षकांनी शुक्रवारी आपला अहवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे सुपूर्द केला. केरळच्या मुख्यमंत्रीपदाचा अंतिम निर्णय आता पक्षश्रेष्ठींनी घ्यावा, अशी विनंती या निरीक्षकांनी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्रीपदासाठी के. सी. वेणुगोपाल,

संमिश्र पानावर

# मालमत्ताधारकांना आता मिळणार ‘अंतिम मालकी’

## नव्या कायद्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव

**रविकिरण देशमुख/मुंबई**

महाराष्ट्र सरकार लवकरच राज्यातील मालमत्ताधारकांसाठी एक क्रांतिकारी कायदा आणण्याच्या तयारीत आहे. मालमत्तेचे वाद आणि वर्षानुवर्षे चालणाऱ्या न्यायालयीन लढायांपासून जनतेला दिलासा देण्यासाठी ‘महाराष्ट्र लँड टायटलिंग ॲक्ट’ प्रस्तावित करण्यात आला आहे. या कायद्यामुळे मालमत्तेच्या ‘गृहीत मालकी’ऐवजी आता नागरिकांना ‘अंतिम आणि कायदेशीर मालकी हक्क’ मिळणार आहेत.

पुढील महिन्यात होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. सध्याच्या व्यवस्थेत जमिनीचा ताबा सिद्ध करता येतो, मात्र मालकी हक्क निर्विवादपणे

संमिश्र पानावर

### महत्त्वाच्या तरतुदी

- **मालकी हक्काची सरकारी हमी :** एकदा हा कायदा लागू झाला की, सरकार अधिकृतपणे मालकी हक्काची हमी देईल.
- **स्वतंत्र प्राधिकरण :** जमिनीच्या नोंदींची पडताळणी करण्यासाठी आणि अंतिम ‘मालकी प्रमाणपत्र’ देण्यासाठी एक स्वतंत्र ‘टायटल रजिस्ट्रेशन अथॉरिटी’ स्थापन केली जाईल.
- **वेगवान निकाल :** वादांच्या निवारणासाठी आता दिवाणी न्यायालयात जाण्याची गरज उरणार नाही. त्यासाठी स्वतंत्र ‘टायटल डिस्प्यूट रिझोल्यूशन ऑफिसर’ आणि ‘लँड टायटलिंग ट्रिब्युनल’ (न्यायाधिकरण) स्थापन केले जाईल.
- **नुकसानभरपाई :** जर प्राधिकरणाने दिलेल्या प्रमाणपत्रात काही त्रुटी आढळली आणि त्यामुळे मालकाचे नुकसान झाले, तर सरकारकडून भरपाईची तरतूदही यात असेल.
- **पूर्णत: डिजिटल रेकॉर्ड :** सर्व नकाशे, जमिनीचे रेकॉर्ड आणि व्यवहार ऑनलाइन केले जातील, ज्यामुळे एकाच मालमत्तेची अनेकांना विक्री करण्याच्या फसवणुकीला आळा बसेल.

## ट्रम्प यांना कोर्टाचा पुन्हा दणका

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या फेडरल कोर्टाने अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेले १० टक्के जागतिक आयात शुल्क ‘अवैध’ आणि ‘कायद्याने अनधिकृत’ असल्याचे स्पष्ट करून ते रद्द केले आहे. टॅरिफ प्रकरणात न्यायालयाने ट्रम्प यांना दिलेला हा दुसरा दणका आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे यापूर्वीचे व्यापक शुल्क रद्द केल्यानंतर, त्यांनी २४ फेब्रुवारी रोजी सर्व देशांवर (भारतासह) १५० दिवसांसाठी हे नवीन १० टक्के शुल्क लागू केले होते. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, ‘इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट’ अंतर्गत असे शुल्क आकारण्याचे अधिकार सरकारला नाहीत.



दहा टक्के टॅरिफही रद्द

‘कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड’ने गुरुवारी दिलेल्या विभागून दिलेल्या निकालात असे म्हटले आहे की, ट्रम्प यांनी ज्या ‘ट्रेड ॲक्ट १९७४’च्या तरतुदींचा वापर केला, त्या केवळ देशाच्या ‘बॅलन्स ऑफ पेमेंट’ (व्यवहार तोल) संकटाच्या वेळीच वापरता येतात. राष्ट्राध्यक्षांना स्वतःच्या मर्जीने तुटीचे

संमिश्र पानावर


# MULTI COMMODITY EXCHANGE OF INDIA LIMITED

Exchange Square, Suren Road, Andheri (East), Mumbai 400 093, India. | CIN: L51909MH2002PLC135594 | Email id: info@mcxindia.com | www.mcxindia.com

MCX METAL & ENERGY Trade with Trust

## STRONG PERFORMANCE EXPANDING MARKET DEPTH

EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2026





**₹2429 Cr** TOTAL INCOME ▲ 101% YoY

**₹1774 Cr** EBITDA | 73% MARGIN ▲ 133% YoY

**₹1332 Cr** PROFIT AFTER TAX ▲ 138% YoY

### ADT GROWTH TRAJECTORY - FY26 ACCELERATION




### FINANCIAL PERFORMANCE (Q4 FY26)

| (₹ Crores) | Q4 FY26 | Q4 FY25 | YoY |
|---|---|---|---|
| Revenue from Operations | 889 | 291 | ▲ 205% |
| EBITDA | 703 | 189 | ▲ 271% |
| EBITADA Margin | 76% | 59% | |
| Profit After Tax | 530 | 135 | ▲ 291% |
| PAT Margin | 57% | 42% | |

### BUSINESS HIGHLIGHTS (FY26)

**Key Rankings** (FIA for 2025)
- MCX is world's largest Commodity Options Exchange
- MCX is world's 4th largest Commodity Exchange

**Growth Drivers**
Two strong pillars of Bullion and Energy with good metals growth
- +496% in Bullion
- +116% in Base Metals
- +29% in Energy

**Balanced Growth of Futures & Options**
- Futures revenue : ₹693 Cr (136%)
- Options revenue : ₹1,398 Cr (109%)

**New Product Expansion**
- Gold Ten Futures
- Electricity Futures
- BULLDEX Options
- Cardamom Futures
- Nickel Futures
- Gold & Silver Monthly Options

**Participation Growth**
- Increase in traded clients - 20.9 lakh, increased from 13 lakh in Fy25
- Healthy growth of new members, financial and corporate institutions

**Robust Delivery Driven Contracts**
- Gold: 21 MT
- Silver: 401MT
- Base Metals: 95,781 MT

**Notes:**
1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with BSE under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on BSE's website at www.bseindia.com and on the Company's website at www.mcxindia.com.
2. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on May 08, 2026.

*Place: Mumbai | Date: May 08, 2026*

Scan QR Code for the complete financial result

OR Visit: https://www.mcxindia.com/investor-relations/quarterly-earnings-release-archive

For **Multi Commodity Exchange of India Limited**
sd/-
**Ms. Praveena Rai**
Managing Director & CEO
DIN:09474203